## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २४/१२/२०१८

### मनमाड शहरात घरफोडया करणारे अट्टल गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले जेरंबद

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो.** यांनी जिल्हयातील नाउघड घरफोडीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी सर्व पोलीस ठाणे तसेच स्थागुशाचे पथकास सराईत गुन्हेगारांचा मागमुस काढुन सतर्क रात्रगस्त करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी घरफोडीचे रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व चोरून नेलेले मुद्देमाल कोठे विक्री केला जातो याबाबत गोपनीयरित्या माहिती घेवुन स्थागुशाचे पथकास गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या.

त्यानुसार दिनांक २३ डिसेंबर २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मनमाड शहर परिसरात रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत होते, दरम्यान पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार मनमाड शहरात घरफोडया करणारे काही संशयीत गुन्हेगार मनमाड रेल्वेस्टेशन परिसरात आले असल्याचे खात्रीशीररित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मनमाड रेल्वेस्टेशन मालधक्का परिसरात रात्रभर सापळा रचुन घरफोडया करणारे सराईत गुन्हेगार नामे **१) संयज किशोर गायकवाड, वय २२,** रा. आनंदवाडी, सुभाषनगर मनमाड, ता.नांदगाव, **२) राजेश रामशंकर शर्मा उर्फ भैय्या, वय २४,** रा. निमज, ता.रतलाम, जि.इंदोर, मध्यप्रदेश यांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी मनमाड शहरातील शांतीनगर व कॅम्प परिसरात बंद घरांचे कडी कोयंडा/कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरफोडया केल्या असल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत **मनमाड पोलीस ठाणेस** दाखल असलेले **१) I गुरनं १७७/२०१८** भादवि ४५४,४५७,३८०, व **२) I गुरनं २४१/२०१८** भादविक ४५४,४५७,३८० असे एकुण **०२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस** आलेले असुन सदर आरोपीतांचे कब्जातुन गुन्हयात चोरून नेलेले मायक्रोमक्स कंपनीचे इन्व्हर्टर, पॉवर बॅटरीज्, गॅस शेगडी व सिलेंडर तसेच गुन्हयात वापरलेली हिरो स्प्लेंडर मोटर सायकल असा **एकुण ३४ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आलेला आहे.

ताब्यात घेतलेला **आरोपी नामे राजेश शर्मा उर्फ भैय्या** हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरूध्द **राजस्थान राज्यातील जयपुर** शहर तसेच **नाशिक, औरंगाबाद, जालना, जळगाव जिल्हयातील** पोलीस ठाण्यांमध्ये दरोडा तयारी, घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल आहे. सदर आरोपी हा जयपुर मध्यवर्ती कारागृह, राज्य राजस्थान व नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातुन घरफोडीचे गुन्हयात शिक्षा भोगुन बाहेर सुटलेला आहे. गेल्या काही दिवसांपासुन तो मनमाड शहरात वास्तव्यास होता, त्याने त्याचे मनमाड येथील साथीदार **संजय गायकवाड** याचेसह मनमाड शहरात घरफोडीचे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांचेकडुन घरफोडी व चोरीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे साो** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल साो** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि श्री.राम कर्पे, पोहवा रविंद्र वानखेडे, पोना रावसाहेब कांबळे, भारत कांदळकर, पोकॉ प्रविण काकड, भाउसाहेब टिळे, गणेश नरोटे, हरिष आव्हाड, गिरीष बागुल, प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले यांचे पथकाने मनमाड शहरातील **सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेवुन घरफोडीचे ०२ गुन्हे उघडकीस** आणलेले आहे.